जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७८ दिनांक - १२/०९/२०२४**

कोथरुड पोलीस ठाणे,पुणे शहर

## चेनस्नॅचिंग चोरी करणा-या तसेच परराज्यातील गुन्ह्यामध्ये पाहिजे असलेल्या गुन्हेगारास कोथरुड पोलीसांकडून बेडया

पुणे शहरांमध्ये चैन स्नॅचिंग गुन्ह्यांचे अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांचेकडून आरोपींचा शोध घेवून गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने मा. पोलीस उपआयुक्त,परि ३,श्री.संभाजी कदम,यांचे मार्गदर्शनाखाली कोथरुड पोलीस ठाणे,तपास पथक अधिकारी व अंमलदार यांचे मार्फत चेन स्नॅचिंग गुन्हेगारांची शोध मोहिम राबविण्यात येत होती.

दि.०३/०९/२०२४ रोजी उजवी भुसारी कॉलनी,कोथरुड,पुणे येथे मॉर्निंग वॉक साठी आलेल्या वयोवृध्द महिलेच्या गळयातील सोन्याची चेनदोन अनोळखी चोरटयांनी हिसका मारुन चोरी करून मोटार सायकल वरून पळून गेले त्या बाबत कोथरुड पो.ठाणे, येथे गुन्हा रजि नं. २५४/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२),३०९(६),३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याचे अनुषंगाने कोथरुड पो.ठाणे कडील तपास पथकातील सपोनि बालाजी सानप,पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर मुळे,आकाश वाल्मिकी,विष्णु राठोड यांनी अथक परिश्रम घेवून तांत्रिक विश्लेषण करुन आरोपी नामे **१) राकेश गोकुळ राठोड,वय-२१ वर्षे,रा.सुप्रीप कॉलनी,एम.आय.डी.सी रोड,जळगाव, २) आदित्य कुंडलिक माझिरे,वय १९ वर्षे,रा.मु.पो.रावडे,ता.मुळशी,जि.पुणे** यांना निष्पन्न करून ताब्यात घेवून गुन्ह्यामध्ये अटक करून तपासा दरम्यान आरोपीं कडून एकूण १,९८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल **(२५ ग्रॅम सोन्याची चेन,२१ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र,एक युनिकॉर्न मो.सायकल,मोबाईल इ.)** जप्त करून ताब्यात घेतला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान आरोपी राकेश गोकुळ राठोड हा जळगाव येथील रेकॉर्डवरील आरोपी असलेबाबत व त्याचे विरुध्द जबरीचोरी,चोरी,घरफोडी,दरोडा यासारखे १५ गंभीर गुन्हे नोंद असले बाबत दिसून आले.तसेच **नमुद आरोपी १)रामानंदनगर पो.ठाणे, जळगाव, २) चोपडा पोलीस ठाणे,जळगाव, ३) भावरकुवा पो.ठाणे, इंदोर,मध्यप्रदेश येथील चेनचोरी,वाहनचोरी गुन्ह्यामध्ये पाहिजे आरोपी असलेबाबत निष्पन्न झाले असून तपासा दरम्यान कोथरुड पोलीस ठाणेक डील २ चेनस्नॅचिंगचे गुन्हे उघड झाले आहेत.**अशा प्रकारे आंतरराज्यामध्ये चेनस्नॅचिंग,चोरी यासारखे गुन्हे करणा-या गुन्हेगारांस कोथरुड पोलीसांनी बेडया ठोकल्या आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर, श्री.प्रविण पाटील, मा.पोलीस उपआयुक्त,परिमंडळ ३,पुणे शहर श्री.संभाजी कदम, मा.सहायक पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग,पुणे शहर.श्री.सरदार पाटील,यांचे अधिपत्याखाली व मार्गदर्शनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संदीप नारायण देशमाने, पोलीस निरीक्षक,गुन्हे, विक्रमसिंह कदम, तपास पथक प्रभारी अधिकारी सह.पो.निरी बालाजी सानप, पोलीस उपनिरीक्षक बसवराज माळी, व तपास पथकातील अंमलदार अजिनाथ चौधर,ज्ञानेश्वर मुळे,संजय दहिभाते,आकाश वाल्मिकी,विष्णु राठोड,अजय शिर्के,शरद राऊत,मंगेश शेळके यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

